


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २६२, शुक्रवार ५ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# धोंड्या गँगवर मोक्कांतर्गत कारवाई करा

**■ संतप्त निघोजकरांची मागणी ■ जत्रा हॉटेलवरील हल्ल्याच्या निषेधार्थ निघोजला हरताळ ■ दोन आरोपी अटकेत ■ सराईत धोंड्या जाधव मात्र पसार**

निघोज : प्रतिनिधी

**निघोजमधील जत्रा हॉटेलवर मंगळवारी मध्यरात्री हल्ला करून प्रविण भुकन यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याच्या निषेधार्थ संतप्त निघोजकरांनी गुरूवारी कडकडीत बंद पाळून हरताळ पाळला. मळगंगा मंदिर परिसरात झालेल्या निषेध सभेत धोंड्या जाधव व त्यांच्या गँगवर मोक्कांतर्गत कारवाई करण्याची आग्रही मागणी करण्यात आली. दरम्यान, या हल्ल्यातील दोघा आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पारनेर पोलिसांना यश आले असून सराईत धोंड्या जाधवसह इतर आरोपी मात्र फरार आहेत.**

निघोज ग्रामस्थ, व्यापारी असोसिएशन, पत्रकार संघ तसेच विविध सामाजिक संघटनांनी या आंदोलनास पाठींबा दर्शवित घटनेचा निषेध केला.

मुक मोर्चामध्ये ठकाराम लंके, खंडू भुकन, सचिन वराळ, दत्ताजी उनवणे, बाबाजी वाघमारे, रूपेश ढवण यांनी आपल्या भावना मांडल्या. यावेळी शशिकला भुकन, वसंत कवाद, नामदेवराव थोरात, अनिल शेटे, चंद्रकांत लामखडे, अमृताशेठ रसाळ, बबुशा वरखडे, रामदास वरखडे, प्रा. ज्ञानेश्वर कवाद, अंकुश लोखंडे, वसंत ढवण, बाळासाहेब रसाळ, योगेश वाव्हळ, महेश लोळगे, मयुर गुगळे, सुरेश खोसे, आनंद भुकन, योगेश खाडे, जयसिंग हरेल, सागर आतकर, रवी रणसिंग यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



■ जत्रा हॉटेलवरील जीवघेण्याण्या हल्ल्याच्या निषेधार्थ निघोजकरांनी कडकडीत हरताळ पाळून मुक मोर्चा काढला. मुक मोर्चाचे निषेध सभेत रूपांतर झाले.

### ग्रामसभेत ठराव करणार

निघोज ग्रामस्थांनी सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत कडकडीत हरताळ फाळला. निषेधसभेमध्ये मंगळवार दि. ९ जुलै रोजी विशेष ग्रामसभा घेऊन धोंडया व त्याच्या साथीदारांवर मोक्कांतर्गत कारवाई करावी असा ठराव करण्यात येणार आहे. त्यात पारनेर व नगर पोलिसांनी हलगर्जीपणा केल्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### हप्तेखोरीची लालसा

धोंड्या जाधव हा सराईत गुन्हेगार आहे. त्याची माहीती पुणे तसेच नगर पोलीसांना आहे. मात्र पोलीस या गुन्हेगारास व त्याच्या साथीदारांना पाठीशी घालतात. धोंडया जाधव हा निघोज, टाकळीहाजी परिसरात फिरून दहशत निर्माण करतो. सर्वसामान्य व्यवसायिकांकडून खंडणी घेतो. याच हप्तेखोरीच्या लालसेतून जत्रा हॉटेलवर हल्ला करून दहशत निर्माण करण्यात आली. अशी दहशत निर्माण केल्यास इतर व्यवसायीकांचे हप्ते सुरू करून घेण्याचा उद्देश असल्याचीही चर्चा निषेध सभेमध्ये सुरू होती.

### शंकर पठारे व विकास पठारे यांना अटक

प्रविण भुकन व इतरांवर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींपैकी शंकर पठारे व विशाल पठारे यांना पोलीसांनी पुणे जिल्हयातून गुरूवारी पहाटेच्या सुमारास अटक केली. त्यांना पारनेरच्या न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी दिली.

### गुन्हेगारीला उत्तेजन

निघोज व परिसरात मोठया प्रमाणावर अवैध व्यवसाय आहे. निघोज व पारनेर पोलिसांना त्याची परिपुर्ण माहीती आहे. तरीही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप निषेध सभेत करण्यात आला. दे हप्ता कर धंदा ही पोलिसांची पध्दत रूढ झाली असून ही पध्दत गुन्हेगारीला उत्तेजन देणारी असल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# मा. नगराध्यक्ष विजय औटी विरोधात फसवणुकीचा गुन्हा

**■ इतर दोघांचाही आरोपींमध्ये समावेश ■ अस्तित्वात नसलेल्या अमार्टमेंटमधील शॉप व फ्लॅटची बनावट नोंद ■ पारनेर नगरपंचायतीने केला दाखल केला गुन्हा**

पारनेर : प्रतिनिधी



**अस्तित्वात नसलेल्या अपार्टमेंटमधील ३५ शॉप व २५ प्लॅट या मालमत्तेची नगरपंचायत दप्तरी नोंद करण्यासाठी बनावट दस्तऐवज संगनमताने तयार करून नगरपंचायतीची फसवणूक केल्याप्रकरणी पारनेर नगरपंचायतीचा माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक विजय सदाशिव औटी याच्यासह अन्य दोघांवर पारनेर पोलीस ठाण्यात बुधवारी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यासंदर्भात नगरपंचायतीचे कार्यालयीन अधिक्षक माधव गाजरे यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे की, दि. २३नोव्हेंबर २०२३ रोजी मुख्याधिकारी विनय शिपाई यांनी भैरवी अपार्टमेंट या मिळकतीची स्थळ पाहणी करण्यासंदर्भात कर्मचारी छबन रघुनाथ औटी, राजेंद्र भाऊसाहेब पठारे, लिंबाजी रामभाऊ कोकरे, पंकज मेहेत्रे यांची नियुक्ती केली होती. या पथकाने पाहणी केली असता भैरवी अपार्टमेंट गट नंबर ३५४१/१,३५४२/२ मधील मिळकत २५९८ बी विंग मध्ये एकूण ४८ शॉप व २४ फ्लॅट अस्तित्वात आहेत. नगरपंचायत रजिष्टर नोंदीप्रमाणे ही इमारत अस्तित्वात आहे.

पारनेर गाव मिळकत गट नंबर ३५४४/१,३५४०/१,३५४४/२/व पारनेर नगरपंचायत मिळकत नंबर २५९४,२५९५,२५९६ ची नगरपंचायतच्या मागणी रजिष्टर नुसार पाहणी केली असता सदर मिळकतीमध्ये भैरवी अपार्टमेंट किंवा इतर नावाने कुठलीही इमारत अस्तित्वात नसून सदरची जागा मोकळी पडलेली दिसत आहे. त्याप्रमाणे सदरचा अहवाल मुख्याधिकारी यांना सादर केल्यानंतर चौकशीअंती नगरपंचायत हददीतील गट नंबर ३५५४/१,३५४०/१ व ३५४४/२ मिळकत नंबर २५९४,२५९५,२५९६ या जमीनीवर भैरवी अपार्टमेंट बिल्डिंग अ ब क अस्तित्वात नसतानाही नगरपंचायत मागणी रजिष्टर तथा नमुना नंबर ८ वर ३५ शॉप व २५ फ्लॅटची बेकायदशीर नोंद लावून सात बारा उताऱ्याचे कागदपत्रे तयार करून नगरपंचायत प्रशासनाची दिशाभूल करण्यात आली आहे.

डिक्लरेशन दस्त सुची क्रमांक २, दस्त क्रमांक ५७१७/२०१५ दिनांक २८/१०/२०१५ मौजे पारनेर मिळकत गट नंबर ३५४४/१,३५४०/१,३५४४/२चे सात बाराचे उतारे व विजय सदाशिव औटी रा. पारनेर याचा दि.२१ नोव्हेंबर २०१५ प्रशासक, नगरपंचायत पारनेर यांना भैरवी अपार्टमेंटच्या नोंदी लावणेबाबत अर्ज दिलेला आहे.

सर्व कागदपत्रांचे आवलोकन करण्यात आले असता विजय सदाशिव औटी रा. पारनेर, संभाजी बबन मगर रा. पारनेर, विजया भागाजी नवले रा. पारनेर यांच्या वतीने विजय सदाशिव औटी याने भैरवी अपार्टमेंटच्या नोंदीसाठी अर्ज देऊन ग्रामअधिकारी तथा तलाठी एस.एन.मोरे यांनी सात बारा उतारे व आठ अ, तत्कालीन दुयम निबंधक यांच्याकडील नोंदीचे दस्त ऐवज सादर करून नोंदणी कर्मचारी नारायण माधव औटी यांना भैरवी अपार्टमेंट व त्यावरील ३५ शॉप व २५ फ्लॅट ही नगरपंचायतच्या मिळकत उतारा नमुना नंबर ८ ला नोंद लावल्याचे निदर्शनास आले आहे. या नोंदी केलेल्या मालमत्ता अस्तित्वात नसल्याने नोंदी लावण्यासाठी संगनमताने दस्तऐवज तयार करून दिशाभूल करून नगरपंचायतीची फसवणूक केल्याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### या कलमांन्वये झाला गुन्हा दाखल

समजून सवरून लोकसेवकाला खोटी माहिती पुरविणे, जे कथन अधिकथन कायद्यानुसार पुरावा म्हणून स्वीकार्य आहे, त्यात केलेले खोटे कथन, अधिकथन खोटे असल्याचे माहीत असताना ते खरे म्हणून वापरणे, ठकवणूक करणे आणि मालमत्तेची सुपूर्दगी करण्यास अथवा मुल्यवान रोख बनविण्यास, त्यात फेरबदल करण्यास किंवा तो नष्ट करण्यास अप्रामाणिकपणे प्रवृत्त करणे, बनावटीकरण, ठकवणूक करण्यासाठी बनावटीकरण, बनावट असल्याचे माहीत असलेला दस्तऐवज खरा म्हणून वापरणे.

### औटीचे पाय आणखी खोलात

खा. नीलेश लंके यांचे सहकारी ॲड. राहुल झावरे यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी विजय औटी हा सध्या पारनेर पोलीस ठाण्यात न्यायालयीन कोठडीत आहे. या आगोदरही औटी याच्या विरोधात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. झावरे हल्ला प्रकरणात जामीन मिळावा यासाठी औटी याने नगरच्या सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता, मात्र बुधवारीच न्यायालयाने औटी याच्यासह इतर दोघांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. झावरे यांच्यावरील प्राणघातक हल्ल्याचे सबळ पुरावे असतानाच आता फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्याने औटी याचे पाय आणखीच खोलात गेले आहेत.

# कांदा, दूध प्रश्नी निर्णय न झाल्यास आंदोलनस्थळी ठिय्या

**■ खासदार नीलेश लंके यांची भूमिका ■ शुक्रवारच्या आंदोलनासंदर्भात पारनेर येथे आढावा बैठक**

पारनेर : प्रतिनिधी

**कांदा व दूध प्रश्नावरील आंदोलन केवळ फोटो काढण्यासाठी करायचे नसून त्यातून काहीतरी निर्णय झाला पाहिजे. सध्या विधानसभेचे अधिवेशन सुरू आहे. शांततेच्या मार्गाने या प्रश्नाची तिव्रता विधीमंडळापर्यंत पोहचवावी लागेल. तरच त्यातून काहीतरी निर्णय होऊ शकेल. जर आपण केवळ दहा वीस लोक जाऊन निवेदन देऊन काही उपयोग होणार नाही. हजारोंच्या संख्येने आंदोलन केले तरच शासनाला जाग येणार असल्याचे सांगत खासदार नीलेश लंके यांनी या प्रश्नावर ठोस तोगडा निघाला नाही तर आंदोलनस्थळी ठियया आंदोलन सुरू करण्याचा इशारा गुरूवारी दिला.**

खा.नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी सकाळी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या तयारीसंदर्भात उर्वरीत पान ३ वर



■ कांदा व दुध प्रश्नावर शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणाऱ्या आंदोलनासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी पारनेर येथे आढावा बैठक घेतली.

# वसंत मोरेंची पुन्हा शिवसेनेत एन्ट्री होणार

**९ तारखेला होणार मातोश्रीवर प्रवेश**



पुणे : प्रतिनिधी

**वंचितकडून लोकसभेची निवडणूक लढविणारे पुण्यातील फायरब्रँड नेते वसंत मोरे यांनी आज उबाठा शिवसेनेचे प्रमुख नेते उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. संजय राऊत हे देखील यावेळी उपस्थित होते. यावेळी वसंत मोरे तुम्ही स्वगृही येताय, पण उशीर केला असे म्हटल्याचे मोरे यांनी सांगितले. तसेच आपण ठाकरे शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचेही मोरे यांनी जाहीर केले.** उर्वरीत पान ३ वर









# शिवार

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# द्राक्षात वाढवा गोडवा!



## साखर कमी होण्याची कारणे अन् उपाययोजना शोधा...

**बऱ्याच द्राक्ष बागायतदारांना द्राक्षांमध्ये गोडी न येण्याची समस्या भेडसावत आहे. परिणामी द्राक्ष काढणीस बराच विलंब होत असूनही अपेक्षेइतकी साखर मण्यात उतरलेली दिसत नाही.**

**द्राक्षाची गोडी टोटल सोल्युबल शुगर (टीएसएस) कमी असणे हे प्रामुख्याने काही घटकांवर अवलंबून असते.**

१ हवामान (Weather) : (अ) हवेतील तापमान, (ब) मुळांच्या क्षेत्रातील तापमान, (क) मण्यांच्या वाढीतील तापमान.

२ व्यवस्थापनातील त्रुटी : अ) जास्त उत्पादन, ब) वेलीचा विस्तार, क) पानांची संख्या, ड) वेलीतील अन्नसाठा, इ) पाणी व अन्नद्रव्याचे व्यवस्थापन, फ) संजीवकांचा अतिरिक्त वापर.



## द्राक्षाची पक्वता उशिरा येण्याची कारणे...

**हवामानातील घटकांचा द्राक्ष मणी वाढ व द्राक्षांच्या परिपक्वतेवर परिणाम होत असतो.**

- तापमान : हवामानातील तापमान हा घटक द्राक्षातील साखर भरण्याच्या क्रियेत मोठा परिणाम करतो. आपल्या सर्वसामान्य समजानुसार, द्राक्षमण्याचे वाढीच्या एकूण तीन टप्प्यांपैकी पहिल्या दोन टप्प्यांमध्ये मिळालेल्या तापमानाचा परिणामही द्राक्षाच्या गोडीवर होतो. द्राक्षाची पक्वता सुरू झाल्यावर जसजसे तापमान १५ ते ३० अंश से. पर्यंत वाढत जाते, तसतसे मण्यातील साखरेचे प्रमाण हळूहळू वाढत जाते. ३३ अंश से. किंवा त्यापेक्षा अधिक तापमान वाढत गेल्यास साखरेचे प्रमाण कमी होते. त्याचप्रमाणे मण्यांची वाढही कमी होते. तापमान जितके जास्त राहते, त्या प्रमाणात आम्लता कमी होत जाते. आम्लामध्ये प्रामुख्याने मॅलीक ॲसिड कमी होते. टारटारेट ॲसिडवर विशेष परिणाम होत नाही. अमिनो आम्लांपैकी प्रामुख्याने प्रोलीन वाढत्या तापमानाबरोबर वाढत जाते. अर्जिनाईन हे अमिनो आम्लही गोडी वाढेल, तसतसे वाढत जाते.
- मुळांच्या कक्षेतील तापमान : द्राक्ष मण्यांत साखर भरण्याच्या वेळेपासून पुढे द्राक्ष वेलींच्या मुळांच्या कक्षेतील जमिनीच्या तापमानाचा साखर वाढण्यावर विशेष परिणाम होतो. जमिनीचे तापमान कमी असल्यास आम्लता वाढल्याचे निर्दशनास येते. पक्वता सुरू असताना जमिनीचे तापमान ३० ते ३२ अंश से. दरम्यान असल्यास ब्रिक्स कमी झाल्याचे निर्दशनास येते.
- वाढीच्या कालावधीत एकूण तापमान : मण्यांच्या वाढीच्या कालावधीत एकूण तापमान थंड असल्यास द्राक्ष पिकण्याची क्रिया फार सावकाश चालते. याउलट तापमान उष्ण असेल तर द्राक्ष पिकण्याची क्रिया वेगाने होते.
- प्रकाश : प्रकाशाचा द्राक्षाची गोडी वाढण्यावर प्रत्यक्षात काही परिणाम होत नसला तरी प्रकाशाचा तापमानाशी संबंध असतो. यामुळे प्रकाशात वाढ झाली तर द्राक्षातील गोडी वाढत जाते.

## संजीवकांचा अतिरिक्त वापर

जी. ए. सारख्या संजीवकांच्या अधिक फवारण्या किंवा फवारणी अथवा घड बुडविण्यासाठी जी.ए. चा अधिक प्रमाणात व उशिरा वापर करणे. मुळे, खोड, ओलांडे या अवयवांमध्ये कमी अन्नसाठा, याशिवाय सी.पी.पी.यु. आणि ब्रासिनोस्टेरॉईड सारख्या अतिशय शक्तिशाली संजीवकांचा अतिरिक्त वापर झाल्यास साखर न भरण्याबरोबरच इतर दुष्परिणाम दिसून येतात. या परिणामामध्ये द्राक्षमणी खूप टणक होणे, गळ कमी होणे, द्राक्षात तुरटपणा येणे आणि पाठोपाठ कडवटपणा येणे, गर पाणीदार न तयार होता घट्ट तयार होणे, द्राक्षात आम्लतेचे प्रमाण कमी असले तरी गोडीचे प्रमाण मात्र अतिशय कमी राहणे आणि गोडी वाढत जाण्याचा वेगही अतिशय कमी असणे यांचा समावेश होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संजीवके वापरायची असल्यास जी. ए. चा वापर कमी करावा लागतो. मुळातच जी. ए. पुन्हा पुन्हा वापर करावा लागू नये किंवा कमी प्रमाणात वापरून, तोच परिणाम साधण्याच्या दृष्टीने सी.पी.पी.यू. आणि ब्रासिनोस्टेरॉईडस या संजीवकांचा वापर सुरू झाला. मात्र, बागायतदारांनी जी.ए. चा तसाच ठेऊन वरील संजीवकांचा वापर वाढविल्याने दोन्हींचे पक्वतेवर परिणाम दिसून येतात. कित्येकदा जी.ए. चा वापर या संजीवकांबरोबर केला जातो. त्यामुळे काढणीचा कालावधी हा पुढे ढकलला जातो.



### मागील दोन-तीन वर्षांत पक्वतेपर्यंत द्राक्षाची अपेक्षित गोडी न येण्याची आढळलेली कारणे...

- नत्रयुक्त खतांचा अधिक वापर : कॅनोपी (विस्तार) किंवा शेंडे वाढ मिळावी म्हणून सुरुवातीपासून नत्रयुक्त खते विशेषतः युरिया अधिक वापरण्याचा कल बागायतदारांमध्ये रूढ होत आहे. घड सावलीत राहिल्यास पिंक बेरीजही कमी येतील, या दृष्टीनेही विस्तार मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.
- युरिया, अमोनिअम नायट्रेट अथवा युरिया फॉस्फेटसारख्या कृषी रसायनांचा फवारणीद्वारे कायम वापर. (हा वापर विशेषतः शेंडा विस्तार मिळवणे, उन्हाची इजा टाळणे, गुलाबी मणी व स्कॉर्चिंग यांचा त्रास कमीत कमी व्हावा यासाठी कॅनोपी मिळवण्यासाठी केला जातो.)

## मुद्दे व्यवस्थापनातील



- उत्पादन : वेलींच्या क्षमतेपेक्षा द्राक्षाचे उत्पादन जास्त असल्यास त्यातील साखरेचे प्रमाण फार सावकाश वाढते. द्राक्षाच्या घडांची संख्या जास्त असेल तर फुटीची वाढ कमी होते व विस्तार मर्यादित राहतो. त्यामुळे साखरेचे प्रमाण वाढण्यावर मर्यादा येतात.
- विस्तार : द्राक्षवेलींच्या विस्तारामुळे बहुतांशी पाने उन्हात असतील तर द्राक्षाची पक्वता वेगाने होईल. पाने व घड दोन्ही सावलीत राहिल्यास सावलीतील घडांची पक्वता उशिरा येते. साखर भरण्याच्या क्रियेत अडथळे येतात. उन्हातील घडांमध्ये साखर भरण्याची क्रिया वेगाने होते.
- पाने काढणे (डिफोलिएशन) : पाने काढण्यामुळे सुद्धा गोडीवर परिणाम होतो. मण्याच्या वाढीच्या कोणत्याही टप्प्यात मोठ्या प्रमाणात पाने काढली तर द्राक्षाची प्रत आणि उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटते. वाढीच्या उशिराच्या टप्प्यात घडाच्या भोवतीची पाने काढली असता घडांचा रंग सुधारतो. फुलोऱ्यापूर्वी पाने काढणे योग्य नाही. पक्वता सुरू झाल्यावर सूर्यप्रकाश पडला तर त्याच्यात साखरेचे प्रमाण वाढते आणि मॅलिक आम्लाचे प्रमाण घटते.
- अन्नसाठा : वेलीतील अन्नसाठा आणि साखर भरण्याच्या वेळेपासून पक्वता पुढे वाढत जाणे, हे प्रामुख्याने वेलीतील कर्बोदकांच्या साठ्यावरही अवलंबून असते. तोडणीवेळी घडांमध्ये असणाऱ्या एकूण साखरेपैकी ४० टक्के शर्करा वेलीच्या साठवणीच्या कर्बोदकांमधून आलेली असते. त्यामुळे खरड छाटणीनंतर शेवटच्या टप्प्यामध्ये वेलीमध्ये भरपूर अन्नसाठा होणे आवश्यक असते. त्याच दृष्टीने पानांचे आरोग्य शेवटपर्यंत चांगले राहणे आवश्यक असते. सातत्याने उत्पादन जास्त घेणे, अयोग्य हवामान, रोगराई किंवा तत्सम कारणामुळे वेलीतील अन्नसाठा कमी होतो. हे लक्षात घेऊन त्यानुसार उत्पादन व्यवस्थापन केल्यास वेलीतील अन्नसाठा भरून निघेल. वेळेवर उपाययोजना केल्या नाहीत तर मात्र हा अन्नसाठा कमी कमी होत जातो. पर्यायाने द्राक्षाला अपेक्षित गोडी (टी.एस.एस) मिळत नाही.
- पाणी व्यवस्थापन : पक्वतेच्या काळात पाणी व्यवस्थापन आणि द्राक्षाच्या तोडणीच्या वेळेची गोडी यांचा जवळचा संबंध आहे. बाजारपेठेतील परिस्थितीनुरूप तोडणी लांबवायची असल्यास द्राक्ष बागायतदार बागेस पाणी देतात किंवा वाढवितात. ड्रीपने पुरेसे पाणी झाले नाही तर प्रवाही पद्धतीने पाणी देतात. त्याचे परिणाम अगदी तोडणीनंतर, छाटणीनंतरच्या फुटीवरही त्याचे दुष्परिणाम दिसतात. गोडी वाढविण्यासाठी अशा पद्धतीचे पाणी नियोजन योग्य नाही. द्राक्षबागेचे पाणी तोडल्यानंतर टी. एस. एस. वाढतो. त्या मागे कॅनोपीतील तापमान वाढणे, घड उन्हात येणे ही प्रत्यक्ष आणि काडीचा शेंडा आणि घड यांच्यात स्पर्धा वाढणे आणि पाणी कमी झाल्याने 'डायल्युशन' (सौम्य परिणाम) यांच्या अप्रत्यक्ष कारणांचा समावेश असतो. शिवाय हरितद्रव्यनिर्मिती आणि अन्न व पाण्याचे वहन यावरही अयोग्य परिणाम होतो. पाण्यामुळे एकूण आम्लता वाढते. हे प्रामुख्याने मॅलिक आम्लात वाढ झाल्याने होते. टार्टारिक आम्लावर फारसा परिणाम होत नाही.
- अन्नद्रव्ये : द्राक्षाच्या टी.एस.एस. मध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने पोटॅशचा वापर करणे आणि नत्रयुक्त खतांचा वापर कमी करणे असे काही प्रयत्न द्राक्ष बागायतदार करत असतात. हे दोन्हीही उपाय प्रामुख्याने टी. एस. एस. वाढत नसताना केले जातात. मात्र त्यापूर्वीच जर नत्र द्राक्षात (काड्या, देठ, ओलांडे) वाढलेला असल्यास त्याचा कॅनोपीवर परिणाम होतो. वेलीचा विस्तार वाढून त्याचा पक्वतेवर परिणाम होतो. शेवटी गोडी येत नाही. म्हणूनच सुरुवातीपासूनच नत्राच्या वापरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. गोडी वाढण्यासाठी पाण्याचा ताण दिल्यास घडातील पोटॅशचे प्रमाण आणखी कमी होते. म्हणूनच नत्र देणे उशिरा थांबविल्यास त्याचा ब्रिक्सवर अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. त्याचप्रमाणे पोटॅशही उशिरा देऊन टी.एस.एस. वाढविण्याचे प्रयत्न बरेच बागायतदार करतात. त्याचाही अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. वस्तुतः जमिनीत उपलब्ध पोटॅशचे प्रमाण पुरेसे अथवा भरपूर असताना आणि पानाचे देठांमध्ये पोटॅशचे प्रमाण भरपूर असल्यास पक्वतेसाठी गोडी उतरण्यास सुरुवात झाल्यानंतर पोटॅश पुरविण्याची काही आवश्यकता नाही. ही सर्व कारणे ही द्राक्षाची गोडी वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

# चिकूच्या काढणीनंतर हवे योग्य व्यवस्थापन



**चिकू फळाचे उगमस्थान मेक्सिको हा देश असून तेथून इतर देशात त्याचा प्रसार झाला. महाराष्ट्रात चिकूची व्यापारीदृष्ट्या लागवड प्रथम ठाणे जिल्ह्यातील घोलवड येथे झाली. भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश व तमिळनाडू या राज्यांत चिकू लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. चिकू लागवडीखालील क्षेत्र व उत्पादनाचा विचार करता महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्रात प्रामुख्याने कालीपत्ती या जातीची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. राज्यात चिकू फळांचा हंगाम मे-जून व जानेवारी-फेब्रुवारी दरम्यान असतो. काढणीनंतर अयोग्य हाताळणीमुळे साधारणपणे १६ ते २० टक्के फळांची नासाडी होते. त्यासाठी चिकू फळांचे काढणीनंतर योग्य व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.**

### रसायनांची प्रक्रिया

फळ काढणीअगोदर चिकू झाडावर कॅल्शिअम क्लोराइड (०.१० टक्के) द्रावणाची फवारणी करावी. त्यामुळे फळांचे आयुष्य वाढण्यास मदत होते.

## चिकू फळाच्या पक्वतेचे मापदंड


चिकूचे फळ झाडावरून काढल्यानंतर पिकते. जर फळे योग्य पक्वतेच्या अगोदर काढली तर पिकत नाहीत व पिकली तरी त्यांची गुणवत्ता चांगली नसते. तसेच फळांची काढणी उशिरा केली तर ती जास्त काळ साठवून ठेवता येत नाहीत. त्यासाठी फळांची काढणी योग्य पक्वतेला करणे अत्यंत आवश्यक असते. फळांच्या काढणीनंतरची गुणवत्ता आणि त्यांचे आयुष्य हे प्रामुख्याने पक्वतेवर अवलंबून असते. फळे आकाराने पूर्णपणे वाढून त्यांची पिकण्याची क्रिया सुरू होऊ लागते, त्यास 'फळांची परिपक्वता' असे म्हणतात. फळधारणेपासून ते फळ काढणीस तयार होईपर्यंत साधारणपणे १५० ते १६० दिवस लागतात. काढणीस तयार झालेली फळे बटाट्याच्या रंगाची होतात. फळाच्या खालील टोकाला असलेला काट्यासारखा भाग हात लावल्यास सहज गळून पडतो. काढणीस तयार फळांची साल नखाने खरडल्यास गर पिवळसर रंगाचा दिसतो. काढणीवेळी फळांवर असलेला पावडरसारखा भाग निघून जातो. तयार चिकू फळांमध्ये चिकाचे प्रमाण फार कमी होते.

## प्रतवारी

झाडावरून फळे काढल्यानंतर त्वरित पॅकहाउसमध्ये आणावीत. त्यानंतर कीडग्रस्त, दबलेली, फुटलेली, तडा गेलेली, खरचटलेली आणि वेडीवाकडी झालेली फळे हाताने निवडून बाजूला करावीत. निवडलेल्या फळांची वजन व आकारानुसार प्रतवारी करावी. दुय्यम दर्जाची फळे स्थानिक बाजारपेठेकरिता आणि प्रक्रियेसाठी वापरावीत. चांगली फळे लांबच्या बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवावीत. प्रतवारी केल्यामुळे फळांना दर चांगला मिळतो. तसेच त्यांची गुणवत्ताही चांगली मिळते.

**चिकू फळांची प्रतवारी प्रामुख्याने तीन ग्रेड्समध्ये होते...**

- ग्रेड-१ (A) : फळांचे वजन १२० ग्रॅमपेक्षा जास्त असते. फळे तपकिरी रंगाची आणि लांबट गोलसर असतात.
- ग्रेड-२ (B) : फळे ९० ते १२० ग्रॅम वजनाची असतात. फळांचा रंग तपकिरी व आकाराने लांबट गोलसर असतात.
- ग्रेड-२ (C) : फळांचे वजन ९० ग्रॅमपेक्षा कमी असते. फळांचा रंग तपकिरी व आकार लांबट गोलसर असतो.



## चिकू फळांची काढणी

फळांची काढणी प्रामुख्याने सकाळी किंवा संध्याकाळी करावी. दुपारच्या उन्हामध्ये काढणी करणे टाळावे. चिकूची काढणी मुख्यत्वेकरून हातानेच केली जाते. यामुळे काढणीवेळी योग्य काळजी घेतल्यामुळे फळांना कमी इजा होते. चिकू फळांच्या काढणीसाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ (दापोली) यांनी विकसित केलेल्या 'अतुल' झेल्याचा वापर करावा. काही ठिकाणी चिकू काढणीसाठी स्थानिक पद्धतीचा अवलंब केला जातो. यामध्ये एक व्यक्ती हाताने काढलेली फळे झाडाखाली पेंडा भरून ठेवलेल्या गादीवर टाकते. दुसरी व्यक्ती ती फळे गोळा करून क्रेटमध्ये भरते. या पद्धतीने कमी वेळेत जास्त फळे काढली जात असल्यामुळे तिचा अधिक वापर होतो.

## फळांचे पूर्वशीतकरण

काढणीवेळी फळांमध्ये असलेली उष्णता काढून घेण्याच्या क्रियेस 'पूर्वशीतकरण' असे म्हणतात. ही क्रिया काढणीनंतर लवकरात लवकर होणे अत्यंत आवश्यक असते. कारण पूर्वशीतकरण क्रियेस उशीर होईल तसा त्यांच्या फळांच्या साठवणुकीवर व प्रतीवर अनिष्ट परिणाम होतो. यामध्ये चिकू फळे शीतगृहामध्ये १० अंश सेल्सिअस तापमान व ९० टक्के आर्द्रतेला साधारण १० तास ठेवली जातात. या क्रियेमुळे फळांची पिकण्याची क्रिया मंदावली जाऊन फळाच्या वजनात येणारी घट कमी होते.

## फळांचे पॅकिंग

काढणीपश्चात व्यवस्थापनामध्ये फळांच्या पॅकिंगला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पॅकिंग केल्याने फळांना एक प्रकारे संरक्षण मिळते. त्यामुळे वाहतूक, साठवण व विक्री व्यवस्था या दरम्यान फळांना होणारी इजा टाळली जाते. तसेच आकर्षक पॅकिंगमुळे विक्रीवेळी ग्राहक मालाकडे आकर्षित होऊन मालाचा खप वाढतो. स्थानिक बाजारपेठेतील चिकू पॅकिंगसाठी प्रामुख्याने बांबूच्या टोपल्या, लाकडी खोकी, क्रेट्सचा वापर केला जातो. दूरच्या बाजारपेठेसाठी प्लॅस्टिक पिशवीत पॅक करून किंवा पनेट्समध्ये फळे भरून त्यांची एकत्रित कोरूगेटेड बॉक्समध्ये पॅकिंग होते. निर्यातीसाठी ४.५ ते १० किलो क्षमतेच्या कोरूगेटेड पेट्यांचा वापर केला जातो.

## फळांची साठवण

चिकू हे अत्यंत नाशवंत फळ असल्याने काढणीनंतर योग्य काळजी न घेतल्यास सामान्य तापमानात १ ते २ दिवसांपेक्षा जास्त वेळ टिकत नाही. फळांची साठवण १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमानाला केल्यास फळांना थंड तापमानाची इजा होण्याची शक्यता असते. म्हणून त्यांची साठवण १२ ते १३ अंश सेल्सिअस तापमानास आणि ९० ते ९५ टक्के आर्द्रतेला केल्यास किमान ३ ते ४ आठवडे साठवून ठेवता येतात. याशिवाय फळे नियंत्रित वातावरणात साठवणगृहादेखील साठवण करून ठेवता येतात. परंतु हे तंत्रज्ञान अत्यंत खर्चिक आहे.



## शॉर्ट न्यूज

### घरफोडी करून अडीच लाखांचा ऐवज लंपास

■ **श्रीरामपुर :** लता गोविंद शिंदे या सेवानिवृत्त शिक्षिकेचे घर वॉर्ड नं. १,गोंधवणी रोडवर लक्ष्मीनारायण नगर येथे आहे. त्यांचे घर बंद असताना अज्ञात चोरट्याने याच दरम्यान त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश करून लाकडी कपाटातील रोख रक्कम तसेच टिव्ही, सेटअप बॉक्स,सोन्याचे दागिने, पितळी टिप, असा एकुण २ लाख ४७ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याप्रकरणी येथील शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.

### शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी पालकर

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील रयत शिक्षण संस्थेचे जनता कन्या विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गणेश पालकर तर उपाध्यक्षपदी अमोल रसाळ यांची निवड करण्यात आली. शिक्षक- पालक संघाच्या उपाध्यक्षपदी विशाल दांगट व सचिवपदी महेश गडदे निवड करण्यात आली. जनता कन्या विद्यालयात शिक्षक व पालक यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यात सर्वानुमते नवीन उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका जोगदंड होत्या.

### शिंगणापूर पालखीचे रविवारी प्रस्थान

■ **शनिशिंगणापूर :** महंत उदासी महाराज आषाढी वारी पायी दिंडी श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर ते पंढरपूर पालखीचे प्रस्थान ६ जुलै रोजी सकाळी ८. ३० वाजता आ. शंकरराव गडाख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर, उपाध्यक्ष विकास बानकर व प्रशासनाने दिली. दिंडी सोहळ्यासाठी देवस्थानचे पदाधिकारी भाविकांना सेवासोयी सुविधा पुरविण्यासाठी सज्ज झाले आहेत. दि. ६ ते १८ जुलै या कालावधीत काकडा, रोज रात्री कीर्तन, भजन, हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रम होऊन दि. १७ रोजी पंढरपूर दिंडी प्रदक्षिणा सोहळा पार पडणार आहे.

### १० अभियंत्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड

■ **कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या सर्व विभागांच्या मदतीने ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभागाचे सातत्याने आपल्या अभियंत्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकऱ्या मिळवुन देण्याचे कार्य अखंड चालु असते. अलिकडेच टी अँड पी विभागाने आपल्या १० अभियंत्यांना ७ कंपन्यांमध्ये त्यांच्या अंतिम निकाला अगोरच चांगल्या पॅकेजच्या नोकऱ्या मिळवुन दिल्या. अशी माहिती संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

### शिधापत्रिका ई - केवायसीसाठी मुदत वाढवा

■ **अकोले :** तालुक्यातील पर्यटनासाठी स्थानिकांना पर्यटनकर न आकरण्याबाबतचे व रेशन कार्डधारकांना ई-केवायसी करण्यासाठी मुदत वाढ मिळण्याचे निवेदन तहसीलदार डॉ सिध्दार्थ मोरे यांना ग्राहक पंचायत च्या अकोले शाखेने दिले. अकोले तालुक्यातील प्रसिध्द पर्यटन स्थळे वन विभाग व पर्यटन विभागाने जागोजागी टोलनाके टाकून पावती फाडतात. मात्र स्थानिक तालुक्यातील पर्यटकांकडून जबरदस्तीने पावती फाडून अरेरावी करून पावती फाडली जाते. ती पावती स्थानिक अकोले तालुक्यातील लोकांकडून घेऊ नये अशी तमाम अकोलेकरांची मागणी आहे.

# एका कुटुंबातील दोन महिलांना मिळणार लाभ!

■ मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमध्ये मोठे बदल
■ सेतू सुविधा केंद्राने पैसे मागितले तर परवाना रद्द



**मुंबई : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमध्ये राज्य सरकारच्या वतीने महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. २१ वर्षांपासून ६५ वर्षांपर्यंतच्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. अडीच लाख रुपयांपर्यंतच्या आत उत्पन्न असणाऱ्या महिलांना या योजनेअंतर्गत पंधराशे रुपये मिळणार आहेत. यामध्ये पाच एकर जमिनीची अट टाकण्यात आली होती. ती अट देखील आता रद्द करण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेमध्ये सांगितले.**

एक जुलैपासून ही योजना लागू झाली असून योजनेत अर्ज करण्यासाठी साठ दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. या साठी दिवसाच्या कालावधीत ज्या महिला अर्ज करतील, त्या महिलांनी एक जुलैला अर्ज केला आहे असे समजून दोन्ही महिन्याचे पेमेंट मिळणार आहे. तर ऑगस्ट महिन्यानंतर ज्या महिला अर्ज करतील, त्यांनी अर्ज केलेल्या दिनांक पासून त्यांना पैसे मिळतील. अशा प्रकारच्या निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती देखील देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

डोमिसाईलचा दाखला हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. तरी या संदर्भात त्या महिलेच्या पतीकडे जर राज्यातील जन्माचा दाखला असेल तर ते देखील या योजनेसाठी चालणार आहे. किंवा पंधरा वर्षांपेक्षा जास्त कालावधीचे रेशन कार्ड किंवा निवडणुकीत मतदान यादी मध्ये त्यांचे नाव असेल तर ते देखील चालणार आहे. ज्यांच्याकडे केशरी आणि पिवळे रेशन कार्ड आहे, त्यांच्यासाठी उत्पन्नाचा दाखल देण्याची अट काढून टाकण्यात आली असल्याची माहिती देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

**सेतू केंद्र कर्मचारी आणि अंगणवाडी सेविकेला ५० रुपये**

एकाही महिलेने एजंटच्या नादी लागू नये. एजंट येत असेल तर त्याची तक्रार करा, अमरावतीमध्ये एका सरकारी कर्मचाऱ्यांने गडबड करण्याचा प्रयत्न केला. त्याला निलंबित करण्यात आले असून त्याला बडतर्फ करण्याचा विचार देखील राज्य सरकार करत असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. इतकेच नाही तर सेतू केंद्र आणि अंगणवाडी सेविकांनी या योजनेमध्ये मदत करावी यासाठी त्यांना देखील प्रति अर्ज पन्नास रुपये राज्य सरकार देणार असल्याची महत्त्वाची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

**तर सेतू सुविधा केंद्राचा परवाना रद्द**

या व्यतिरिक्त ज्या सेतू सुविधा केंद्राच्या माध्यमातून महिलांची आर्थिक लूट करण्याचा प्रयत्न केला जाईल किंवा तसा पुरावा मिळेल. त्या सेतू सुविधा केंद्राचा परवाना रद्द करण्यात येईल, असा कडक इशारा देखील देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. या योजनेचे काम ऑफलाइन आणि ऑनलाईन देखील करण्यात आले आहे. ऑनलाइन मुळे एकाच दिवशी अनेक लाभार्थी अर्ज भरण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सुरुवातीच्या काळामध्ये काही तांत्रिक अडचणी येत असतात. मात्र हळूहळू अडचणी देखील दूर करण्यात येत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**एका कुटुंबातील दोन महिलांना लाभ**

या योजनेच्या माध्यमातून एका कुटुंबातील दोन महिलांना लाभ देण्यात येणार आहे. यातील एक विवाहित असेल आणि दुसरी अविवाहित असेल तरी देखील योजनेचा लाभ घेता येईल, असे देखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. आम्ही कुटुंब नियोजन करून चूक केली का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. या प्रश्नाचे उत्तर देखील या माध्यमातून मिळाले असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## वाचकांच्या लेखणीतून

# आयत्यावर कोयता?

**निघोजमध्ये तलवार, कोयता, पाईप, दांडक्याने जीवघेणा हल्ला अशी थरारक बातमी वाचली (पारनेर दर्शन, ४ जुलै, गुरुवार).**

या बातमीत देवीभोयरे-निघोज रस्त्यालगत असलेल्या जत्रा या हॉटेलचा चालक, प्रवीण भुकन यावर आदित्य पठारे, धोंड्या जाधव, प्रथमेश ऊर्फ सोन्या सोनवणे आणि शंकर पठारे या तरुणांनी तलवार, कोयता, पाईप, दांडक्याने जीवघेणा हल्ला केला आहे. हॉटेल चालक जखमी असून त्यास नगरला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आल्याचे समजते. झाला प्रकार अनिष्ट आणि भयानक आहे. हल्लेखोरांचा निषेध म्हणून एक दिवस निघोज येथे बंद पाळण्यात येणार असल्याचेही समजते.



हल्लीच्या तरुण पिढीचे धाडस आणि धडाडी यांचे कौतुक वाटते. पण त्याचा प्रत्यय अशा विध्वंसक किंवा दहशतीच्या मार्गाने व्यक्त व्हावा हे अयोग्य आणि बेकायदेशीर आहे. या हल्ल्याचा हेतू हप्तावसुली असावा अशी कुजबूज आहे. तसे असेल तर आयत्यावर कोयता म्हणतात तो हाच की काय? या तरुणांनी आपला उत्साह, शक्ती आणि धाडस सामाजिक, शैक्षणिक अशा विधायक कार्यांत लावल्यास उत्तम होईल. समाजात त्यांचे नाव होईल. ते शोभूनही दिसेल.

हल्ली संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असतात. त्यामुळे संशयित गुन्हेगार पकडण्यात पोलिसांना सोपे होते. त्याचाही या तरुणांनी विचार करावा. जीवन अमूल्य आहे. ते या तरुणांनी फुकाफुकी का दवडावे?

**तड़पते दिल की सदा वो सुने या ना सुने।**
**अपना तो फ़र्ज़ है कि पुकारते रहे।।**

शकील बदायुनी म्हणतात, तळमळणाऱ्या काळजाचा पुकारा कुणी ऐको वा न ऐको. पुकारीत राहणे आपले कर्तव्य आहे.....
माझेही तेच म्हणणे आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

## कांदा, दूध प्रश्नी निर्णय न झाल्यास आंदोलनस्थळी ठिय्या

पारनेर येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत खा. लंके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, रामदास भोर, भगवान फुलसौंदर बाबाजी तरटे, सुदाम पवार, अर्जुन भालेकर, बाळासाहेब कावरे, सतिश भालेकर, कारभारी पोटघन, जितेश सरडे, बाळासाहेब दिघे, अनिल गंधाक्ते, बापू शिर्के, बाळासाहेब खिलारी, डॉ. आबासाहेब खोडदे, योगेश मते, बाळासाहेब लंके, रविंद्र राजदेव, प्रसाद नवले, किरण ठुबे, महेंद्र गायकवाड, भुषण शेलार, डॉ सादीक राजे, सलिम राजे यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, दुध तसेच कांद्याच्या दरवाढीबाबत प्रचंड तिव्रता आहे. ज्यावेळी आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून काम करतो, त्यावेळी आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढले पाहिजे. मी लोकसभा निवडणूकीच्या प्रचारादरम्यानच घोषणा केली होती की, १३ तारखेला मतदान झाल्यानंतर दुध व कांद्याच्या प्रश्नावर आंदोलन करणार आहोत. मात्र कायदेतज्ज्ञांचा सल्ला घेतला असता मी मी उमेदवार असल्याने त्यादरम्यान एखादा जरी गुन्हा दाखल झाला तर सबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्याबाबत कायद्यामध्ये तरतूद आहे, त्यामुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आले होते. लोकसभा निवडणूकीच्या निकालानंतर शिक्षक मतदारसंघाची आचारसंहिता सुरू झाली. २ तारखेला आचारसंहिता संपल्यामुळे ५ जुलै रोजी आंदोलनाची तारीख निश्चित करण्यात आल्याचे लंके म्हणाले.

**हे सरकार जाड कातडीचे**

आंदोलनात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मार्ग निघाला नाही तर लाक्षणीक उपोषणाचा निर्णय घेण्यात येऊन तिथेच ठिय्या देण्यात येईल. हे सरकार जाड कातडीचे सरकार आहे. हजारोंच्या संख्येने चक्का जाम केला तरच हे सरकार जागे होईल असे खा लंके म्हणाले.

**पियुष गोयल म्हणतात, हा विषय राज्य शासनाचा**

परवा मी दिल्लीमध्ये मंत्री पियुष गोयल यांना भेटलो. त्यांच्याशी दुध दरवाढीबाबत चर्चा केली असता त्यांनी हा विषय राज्य शासनाशी निगडीत असल्याने या विषयावर राज्य शासनाशी चर्चा करण्याचा सल्ला देत दुध दरवाढीबाबत राज्य शासनावर जबाबदारी ढकलल्याचे खा. लंके म्हणाले.

**भेसळीबाबत संसदेत कायदा**

दुध भेसळ रोखण्यासाठी संसदेमध्ये कायदा करण्यात येणार आहे. कायद्याच्या अंमलबजावणीनंतर अशी भेसळ करणारांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे लंके म्हणाले.

**आंदोलनात कांदा आणि जनावरेही**

कांदा तसेच दुध प्रश्नावर मागणी करूनही सरकार दुर्लक्ष करीत आहे. शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारच्या आंदोलन स्थळी दुभती जनावरे तसेच कांद्याच्या गोण्याही आणण्यात येणार आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांना दुधाचे वितरण करून या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

## वसंत मोरेंची पुन्हा शिवसेनेत एन्ट्री होणार

मी शिवसेनेचा शाखा प्रमुख होतो, माझा परतीचा प्रवास पुन्हा शिवसेनेकडे होतोय. उद्धव ठाकरेंनी स्वगृही आल्याबद्दल स्वागत केले. मी उशीर केला असे ते म्हणाले. आता पक्ष प्रवेश करणार आहे, बाकी चर्चा पुढे होईल, असे वसंत मोरे म्हणाले. तसेच आज नाही तर येत्या ९ तारखेला मातोश्रीवर पक्ष प्रवेश करणार असल्याचे मोरे यांनी जाहीर केले.

मी मनसे सोडून वंचितमध्ये गेलो होतो. मात्र मतदारांनी मला स्वीकारले नाही, असेही त्यांनी वंचित सोडण्याचे कारण सांगितले. पुण्यात शिवसेनेकडून महापालिका निवडणुकीत कडवे आव्हान देणार असल्याचे मोरे म्हणाले.

विधानसभा लढविणार का या प्रश्नावर मोरे यांनी आता पक्ष प्रवेश करू, नंतर यावर चर्चा करू असे मोरे म्हणाले. तसेच विधासभा लढविण्यासाठी माझ्याकडे दोन पर्याय आहेत. खडकवासला आणि हडपसर या दोन्ही मतदारसंघातून मी लढू शकतो. लोकसभेला पुणे शहरात माझे मतदान नव्हते, माझा तो भागही नव्हता. तरीही मला चांगली मते मिळाली आहेत. माझ्यावर पहिला गुन्हा शिवसेनेत असताना झाला. मी बदलणार नाही, जनतेसाठी, जनतेच्या हितासाठी काम करत राहू, असेही मोरे यांनी स्पष्ट केले.

**मनसे का सोडलेली?**

वसंत मोरे हे मनसेत असल्यापासून कायम चर्चेत राहिले होते. अनेकदा पक्षात राहून वसंत मोरे यांनी पक्षातील स्थानिक नेत्यांवर टीकास्त्र सोडले होते. राज ठाकरेंच्या मशिदीवरील भोंग्याविरोधात आंदोलनाला वसंत मोरे यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर वसंत मोरे यांची तातडीने पुणे मनसे शहर अध्यक्षपदावरून उचलबांगडी करण्यात आली. वसंत मोरे यांना पदावरून हटवल्यापासून ते मनसेला रामराम करतील अशी चर्चा होती. त्यातच वसंत मोरे यांनी पुणे मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी केली होती. मात्र, मनसेची लोकसभेची भूमिका पाहता मोरे यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)

● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार

● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार

● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर

* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *

9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# राहुल रसाळ वसंतराव नाईक पुरस्काराचे मानकरी!

## ■ एकनाथ शिंदे, धनंजय मुंडे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण ■ पारनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

निघोज : प्रतिनिधी

निघोजच्या शिववाडीतील प्रगतीशील व प्रयोगशील युवा शेतकरी राहुल अमृताशेठ रसाळ यांना मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामविकास प्रतिष्ठाणच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा वसंतराव नाईक नाविन्यपूर्ण शेतकरी पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृहात समारंभपुर्वक प्रदान करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील कृषी विभागात काम करणाऱ्या सामाजिक संस्था तसेच असंख्य प्रगतीशिल शेतकरी यांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यावेळी कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ. निलय नाईक, आ. राजेश राठोड, आ. इंद्रनिल नाईक, कुलगुरू डॉ. प्रशांत पाटील, प्रतिष्ठाणचे अध्यक्ष राजेंद्र बारवाले, सचिव दिपक पाटील, विश्वस्त डॉ. आनंद पटवर्धन, मुश्ताक अंतुले आदी यावेळी उपस्थित होते.



■ निघोज येथील युवा शेतकरी राहुल अमृताशेठ रसाळ यांना वसंतराव नाईक नाविन्यपूर्ण शेतकरी पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मुंबईत प्रदान करण्यात आला.

### उत्पादनांना आखाती देशात मागणी

रसाळ यांच्या फळबागेतील डाळींब, द्राक्ष या उत्पादनांना अरब राष्ट्रांमधून मागणी असते. दरवर्षी ही उत्पादने अरब राष्ट्रांमध्ये निर्यात केली जातात. त्यामुळेच रसाळ यांना आतापर्यंत राज्य सरकार व विविध सामाजिक कृषी संस्थांकडून असंख्य पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले आहे.

### वडीलांचे मार्गदर्शन

रसाळ यांचे वडील अमृताशेठ रसाळ हे बांधकाम क्षेत्रात असले तरी प्रगतीशील शेतकरी म्हणूनच त्यांची ओळख आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली राहुल यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करीत शेतीमध्ये महत्वपूर्ण बदल केले. कमी पाणी, सेंद्रीय खते यांचा वापर करून त्यांनी वडीलांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श निर्माण केला आहे.

### युवा शेतकऱ्यांना प्रेरणा देणारी शेती

कमी पाण्यात व कमी खर्चात सेंद्रीय शेती करणारे युवा शेतकरी म्हणून राहुल रसाळ यांची राज्यभरात ओळख आहे. सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून फळबागांमधून ते उत्पादन घेत असून गेल्या दहा वर्षांपासून त्यांची प्रयोगशील शेती पाहण्यासाठी राज्यभरातील हजारो शेतकऱ्यांनी आजवर निघोजला हजेरी लावलेली आहे. निघोजच्या शिववाडी परिसरातील त्यांची शेती एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले असून युवा शेतकऱ्यांना प्रेरणा देणारी त्यांची शेती आहे.

# रोकडे दाम्पत्याला दत्तक विधान सोहळयाचे दुसऱ्यांदा भाग्य !

## नगरच्या स्नेहांकुर संस्थेत पार पडला -हृदय सोहळा

सुपा : प्रतिनिधी

स्नेहांकुर संस्थेतील मुलीस तिरूपती बालाजी येथे पुजारी म्हणून काम पाहणाऱ्या श्रीनिवास व दिव्या यांनी दत्तक घेतले. हा दत्तक विधान सोहळा सुप्याच्या सरपंच मनिषा रोकडे व उद्योजक योगेश रोकडे यांच्या उपस्थितीत पार पडला. यापूर्वीही कार्तिक व रिया पुरूषोत्तम यांनी दत्तक घेतलेल्या बालकाच्या दत्तक विधान सोहळयासही रोकडे दाम्पत्यास उपस्थित राहण्याचे मा मिळाला होता. या सोहळयानिमत्त रोकडे यांना हे भाग्य दुसऱ्यांदा लाभले आहे.

कायदेशिर बाबींची पुर्तता झाल्यानंतर मनिषा व योगेश रोकडे यांच्या हस्ते या बालकास श्रीनिवास व दिव्या यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या दाम्पत्याचे अनेक दिवसांचे स्वप्न पुर्ण झाल्याने कृतकृत्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. स्नेहांकुर या संस्थेविषयी आम्ही नेहमीच ऋणी राहू अशी ग्वाही देतानाच या बाळाला आम्ही आयुष्यभर आनंदी ठेऊ असा विश्वास या दाम्पत्याने व्यक्त केला.



■ स्नेहांकुर या संस्थेतील बालकाचा सरपंच मनिषा रोकडे व उद्योजक योगेश रोकडे यांच्या उपस्थितीत दत्तक विधान सोहळा पार पडला.

### हे आमचे भाग्य !

स्नेहांकुर संस्थेस मदत करणे हे आमचे कर्तव्य आहे. त्यातून प्रसिध्दी मिळविणे हा देखील आमचा हेतू नाही. स्नेहांकुर संस्थेमार्फत होत असलेले काम अव्दितीय आहे. त्यांच्या या कामात आमचाही खारीचा वाटा असावा या हेतूने आम्ही या संस्थेच्या नेहमीच संपर्कात असतो. यापुढील काळातही आमचे संस्थेसाठी योगदान असेल. हे योगदान देण्याची संधी आम्हास मिळते हेच आमचे भाग्य आहे.

**मनिषा रोकडे** सरपंच, सुपा
**योगेश रोकडे**, उद्योजक

उद्योजक योगेश रोकडे व त्यांच्या पत्नी सुप्याच्या सरपंच मनिषा रोकडे यांचे स्नेहांकुर संस्थेशी जिव्हाळयाचे संबंध आहेत. सामाजिक राजकीय काम करताना रोकडे दाम्पत्य नेहमीच सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून मदतीचा हात पुढे करते. अशीच मदत रोकडे यांच्याकडून स्नेहांकुर संस्थेला असते. या गोड सोहळयाप्रसंगी सरपंच मनिषा रोकडे, उद्योजक योगेश रोकडे, बाळासाहेब वारूळे, ग्रामपंचायत सदस्य पप्पू पवार, सोसायटीचे संचालक राहुल पवार, महेश जगदाळे, भाऊ गायकवाड आदी उपस्थित होते.

# खासदारांचा आदर्श घेत शालेय साहित्याचे वाटप

## नांदूरपठारच्या ग्रामस्थांचा आदर्श

नांदूरपठार : प्रतिनिधी

माझ्या सत्कारासाठी हार, फुले, बुके, शाल, फेटा आदी वस्तू न आणला गोरगरीब विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असे शालेय साहित्य भेट देण्याचे आवाहन करणाऱ्या खा. नीलेश लंके यांचा आदर्श घेत नांदूरपठार येथील ग्रामस्थांनी गरजू शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण केले.

नांदूरपठार आणि खा. नीलेश लंके यांचे नाते अनोखे असून त्यांच्याच आदर्शावर वाटचाल करीत नांदूरपठारमधील त्यांचे सहकारी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून आपली सामाजिक बांधिलकी जपत आहेत. वृक्षारोपण असो वा अडचणीत असलेल्या ग्रामस्थाला मदत करण्याची भूमिका असो लंके यांचे सहकारी त्यांना नेहमीच मदतीचा हात देतात.

अलिकडेच शाळा सुरू झाल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी त्यांना भेट मिळालेले शालेय साहित्य हजारो विद्यार्थ्यांना वितरीत केले. तोच आदर्श डोळयापुढे ठेउन नांदूरपठारच्या शाळेमध्ये लंके यांच्या सहकाऱ्यांनी स्कुल बॅग, इंग्रजी व मराठी अंकलिपी, राजा पाटी, दुहेरी, चार रेखी, चौकट व एकेरी वळया, स्कॉयर बुक आदी शालेय साहित्य विद्यार्थ्यांना भेट दिले.

शालेय साहित्य वितरीत करताना मा. उपसरपंच रविंद्र राजदेव, नामदेवशेठ आग्रे, नवनाथ पाटील घोलप, सखाराम आग्रे, गोपाळा आग्रे, भास्कर चौधरी, सुदाम आग्रे, तुळशीराम आग्रे, दगडू आग्रे, वाळुंज गुरूजी व जाधव गुरूजी उपस्थित होते. लंके प्रतिष्ठाणच्या कार्यकर्त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल शिक्षकांनी त्यांना धन्यवाद दिले.



■ नांदूरपठार येथील खा. नीलेश लंके यांच्या सहकाऱ्यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण केले.

### आम्ही आमचे कर्तव्य पार पाडले

आमचे नेते खासदार नीलेश लंके हे सदैव जनतेच्या सेवेसाठी झगडत असतात. शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांना ते विविध मार्गाने मदत करत असतात. त्यांचे हे समाजकार्य दररोज सुरू असते. शाळा सुरू झाल्यानंतर शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची आवष्यकता होती. आम्ही सहकाऱ्यांनी हे साहित्य खरेदी करून गरजू विद्यार्थ्यांना भेट देत आमचे कर्तव्य पार पाडले.

**रविंद्र राजदेव**
मा. उपसरपंच, नांदूरपठार

# उपसा सिंचन योजनेसंदर्भात रविवारी बैठकीचे आयोजन

## विश्वनाथ कोरडे दादा यांचा पुढाकार

पारनेर : प्रतिनिधी



पारनेर तालुक्याच्या कोरडवाहू भागासाठी वरदान ठरणाऱ्या उपसा सिंचन योजनेसंदर्भात पुढील दिशा ठरविण्यासाठी कान्हूरपठार येथील व्यवहारे मंगल कार्यालयात शेतकऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहीती भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी दिली.

पारनेरचे हक्काचे पाणी मिळवून तालुक्याच्या अर्थकारणात अमुलाग्र बदल घडविण्यासाठी उपसा सिंचन योजनेबाबात गेल्या तीन ते चार दशकांपासून केवळ चर्चा होत असून आजवर अनेक नेतृत्वांकडून तालुक्यातील शेतकरी वर्गाची घोर फसवणूक झाल्याची भावना आहे. या प्रकल्पासाठी आवष्यक असलेल्या निधीच्या उपलब्धतेसाठी राजकीय इच्छाशक्ती, धरणात उपलब्ध असलेल्या पाणी वाटपाचे मांडले जाणारे चुकीचे गणित, राजकीय उदासिनता, जनरेटयाचा अभाव या विलंबास करणीभुत झाल्याचे कोरडे यांचे म्हणणे आहे.

उपसा सिंचन योजनेसंदर्भात नागरीकांच्या मनामध्ये दाटलेलं मळभ दुर करण्यासाठी गेल्या महिन्यात तालुक्यातील चारशेहून अधिक शेतकऱ्यांची कराड जवळील टेंभू उपसा जलसिंचन प्रकल्पास भेट घडवून आणण्यात आली. तेथील भौगोलीक परिस्थिती, प्रकल्पाची व्याप्ती, प्रकल्प मार्गी लावणारे नेतृत्व तसेच हा प्रकल्प मार्गी लावणारे स्थानिक कार्यकर्ते याच्याशी संवादही साधण्यात आला. त्यानंतर पारनेरचा प्रकल्प मार्गी लागणे अशक्य नसल्याचा विश्वास शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला. पारनेरचा प्रकल्प टेंभू प्रकल्पापेक्षा अतिशय लहान आहे. आपण आपले राजकीय कसब पणाला लाऊन पारनेरची योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.पहिल्यापेक्षा दुप्पट वेगाने शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याची ग्वाही कोरडे यांनी दिली.

या लढयाची पुढील दिशा ठरविण्यासाठी तालुक्यातील सर्वपक्षीय, समविचारी सहकाऱ्यांशी चर्चा करण्याची आवष्यकता आहे. सर्वसमावेशक चर्चा करून दिशा निश्चित करण्याची वेळ आली असून तालुक्यातील सर्व शेतकरी, शेतमजुर, कष्टकरी, शेती व्यवसायाशी निगडीत असलेले व्यापारी, विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच शेतकऱ्यांविषयी अस्था असणाऱ्या नागरीकांनी बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वनाथ कोरडे यांनी केले आहे.

# सरपंच कारखिले यांच्या आंदोलनास यश!

## राळेगणथेरपाळ-म्हसे खुर्द रस्त्यासाठी ११ कोटींची तरतूद

निघोज : प्रतिनिधी

राळेगणथेरपाळ ते म्हसे खुर्द या रस्त्याच्या कामासाठी पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात ११ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती राळेगणथेरपाळचे सरपंच पंकज कारखिले यांनी दिली.



यासंदर्भात अधिक माहीती देताना कारखिले यांनी सांगितले की, गेल्या फेब्रुवारी महिन्यात मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात स्वातंत्रपूर्व काळापासून वंचित असलेल्या राळेगणथेरपाळ ते म्हसे खुर्द या रस्त्यासाठी निधी उपलब्ध व्हावा यासाठी आपण पाठपुरावा केला होता. मात्र हा निधी मिळू नये म्हणून तत्कालीन आमदार तथा विद्यामान खासदार नीलेश लंके यांनी विरोध केल्याचा आरोप कारखिले यांनी केला.

कारखिले म्हणाले, साडेपाच किलोमीटर अंतर असलेल्या या रस्त्याच्या कामासाठी निधी अडविल्याच्या निषेधार्थ आपण उपोषणाचा मार्ग अवलंबिला. या आंदोलनास भाजपाचे पदाधिकारी, नेते तसेच ग्रामस्थ, तालुक्यातील इतर राजकीय पक्षाचे नेते यांचाही पाठींबा मिळाला. जिल्हाधिकारी, तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी या आंदोलनात मध्यस्थी करत पावसाळी अधिवेशनात या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली होती. त्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले होते.

पालकमंत्री विखे यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभुमीवर अर्थमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन या रस्त्याच्या कामासाठी आर्थिक तरतुद करण्यासाठी लक्ष वेधले होते. या मागणीची दखल घेउन अजितदादा पवार यांनी या कामासाठी ११ कोटी रूपयांची तरतुद केल्याचे कारखिले म्हणाले.

### विकासकामांसाठी कटीबद्ध

एक अभ्यासू व कार्यक्षम सरपंच काय काम करू शकतो हे या कामासाठी निधीची तरतूद झाल्यानंतर जनतेच्या निदर्शनास आले. जिल्हा परिषद, खासदार निधी तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून राळेगण थेरपाळ, म्हसे या परिसरात कोटयावधींची कामे मार्गी लावला आली. यापुढील काळातही विकास कामांसाठी आपण कटीबद्ध आहोत.

**पंकज कारखिले**
सरपंच, राळेगणथेरपाळ

# नव्या ग्रंथालयांना मान्यता, ४० टक्के वाढीव अनुदान

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची ग्वाही । नगरच्या शिष्टमंडळाने मुंबईत घेतली भेट

पारनेर/सुपा : प्रतिनिधी

विधानसभा निवडणूकीपूर्वी नव्या ग्रंथालयांना मान्यता देण्यात येऊन अनुदानातही ४० टक्के वाढ करण्याची ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

ग्रंथालय चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आ. मोनिकाताई राजळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील ग्रंथालयांच्या विविध प्रश्नांसदर्भात मंत्री पाटील यांची विधानभवनामध्ये भेट घेऊन निवेदन सादर केले. अनुदानातील ४० टक्के वाढ तातडीने देण्यात येईल. नव्या ग्रंथालयांना परवानगी देण्यात येईल अशी ग्वाही पाटील यांनी दिली. अनेक वर्षांपासून रखडलेल्या दर्जा बाबात सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही देखील पाटील यांनी दिली.

शिष्टमंडळात विष्णूपंत पवार, संजय कराळे, पनाजी कदम, सुरेंद्र शिंदे, नामदेव गरड, संदीप पठाड, मच्छिंद्र आठरे, विलास कांबळे यांचा समावेश होता.

सन २०१२ पासून नव्या ग्रंथालयांना परवानगी देण्यात येत नाही. आहेत त्या ग्रंथालयांचा वर्ग बदलण्यात आलेला नाही. त्यामुळे तुटपुंज्या अनुदानात ग्रंथालय चालविताना तारेवरची कसरत करावी लागते.मंत्री पाटील यांनी साठ टक्के वाढ देण्याअगोदर ड वर्गातील ग्रंथालयांना फक्त तीस हजार रूपयांत वर्ष काढावे लागत होते. परिणामी वाचकांना हवे ते साहित्य मिळत नव्हते. कर्मचाऱ्यांना तुटपुंज्या पगारावर काम करावे लागते. यासाठी वर्ग बदलास प्राधान्य देण्यात यावे.

सुरेंद्र शिंदे ग्रंथालय चालक



■ ग्रंथालयांच्या प्रश्नांसदर्भात आ. मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथालय चळवळीच्या कार्यकर्त्यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांची विधानभवनामध्ये भेट घेऊन निवेदन सादर केले.

### वाढीव अनुदान तातडीने देणार

अनुदानातील ४० टक्के वाढ तातडीने देण्यात येईल तसेच केंद्र सरकारकडून मिळणारे ४०० कोटींचे अनुदान तातडीने उपलब्ध करून सर्व वर्गाच्या ग्रंथालयांना समप्रमाणात वितरण करण्याचा मानस आहे. दर्जामध्ये वाढ व नव्या वाचनालयांच्या मान्यतेबाबत लवकरच घोषणा करण्यात येईल.

**चंद्रकांत पाटील**
मंत्री

# डीबीएमचे २३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत

## इ.५ वीच्या १७ तर ८वीच्या ७ विद्यार्थ्यांचे यश

राळेगणसिध्दी, सुपा : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत राळेगणसिध्दी येथील डी.बी.एम. स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. इयत्ता ५ वी चे १७ तर इयत्ता ८ वी चे ७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले.

यशस्वी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच आपल्या अथक परिश्रम व आपल्या प्रामाणिक प्रयत्नांनी हे यश संपादन केले आहे. विद्यालयाचे प्राचार्य जे.डी. मापारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, आपल्या शाळेसाठी ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे हे फलित आहे. शाळेच्या अध्यापकांनी देखील त्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केल्याचे मापारी यांनी आवर्जुन सांगितले.

गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक काळोखे, अन्नू राय, पोटे, जाधव, स्मिता, कडूस, डमाळे यांचे प्राचार्य जे डी मापारी, शितल मापारी यांनी अभिनंदन केले.




■ शिष्यवृत्ती परीक्षेत डी.बी.एम स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

### इयत्ता ५ वी चे गुणवंत

श्रवण ढोरमले, श्रुती पोटे, श्रृष्टी पोटे, श्रृष्टी भापकर, श्रेया पठारे, ओम देशमुख, स्वरूप होले, वेदांत भगत, श्रेया रासकर, सोहम गाढवे, स्वराज शिंदे, आराध्या झंजाड, सिध्दी शिंदे, शिवतेज झंजाड, विराज भोर, समर्थ चिपाडे, आयुष पोटघन, स्वरा मापारी.

### इयत्ता ८ वी चे गुणवंत

अपेक्षा शेळके, राजवर्धन जवक, श्रावणी भगत, तनिष्का मापारी, साई मापारी, सेजल जाधव, साईराज पोटे.

### विद्यालयाने मैलाचा दगड रोवला !

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे आपल्या शाळेचे नाव उज्वल झाले आहे. त्यांच्या कुटूंबियांनीही पाल्यांच्या या यशानंतर आनंद व्यक्त केला. शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्वाची पायरी असते. त्यात विद्यार्थ्यांनी दाखविलेले यश त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वाचे आहे. शाळेच्या या यशामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल आणि पुढील शैक्षणिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरणा मिळेल. डी.बी. एम.स्कुलने आपल्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मैलाचा दगड रोवला असून यापुढेही विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण देण्यासाठी संस्था वचनबध्द आहे.

**जे.डी.मापारी**
प्राचार्य

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com